www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २१४ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१४ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## बाळासाहेबांवर बोलणाऱ्यांना तुम्ही प्रवक्ता करता:‘लाव रे तो व्हिडिओ’ म्हणत राज ठाकरेंचा उद्धव ठाकरेंवर प्रहार

**ठाणे (वृत्तसंस्था)**–मी महायुतीला बाहेरुन पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मी काहीही बोलू शकतो. तुम्ही कसलं फोडाफोडीचे राजकारण सांगत आहात. वडील चोरले म्हणता मग बाळासाहेबांवर टीका करणाऱ्या सुषमा अंधारे 'या' बाईला पक्षाचे प्रवक्ते कसं करता, असा सवाल राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना केला. यावेळी राज ठाकरे यांनी 'लावा रे तो व्हिडीओ' म्हणत सुषमा अंधारे यांचा व्हिडिओ दाखवला व उद्धव ठाकरेंवर टीका केली.

राज ठाकरे म्हणाले की, जर समजा २०१९ अडीच वर्षे तुमचे असे भाजपने मान्य केले असते तर आता उद्धव ठाकरे ज्या पद्धतीने मोदींवर बोलत आहेत. टीका करत आहेत. तशी टीका तुम्ही केली असती का, असा हल्लाबोल केला. शिवसेनेचे ठाणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार नरेश म्हस्के आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची आज ठाण्याच्या कळ्यावत प्रचारसभा आयोजित करण्यात आली.शरद पवारांनाही राज ठाकरेंनी या सभेतून हल्लाबोल केला आहे. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, फोडाफोडीच्या राजकारणाची महाराष्ट्रात कुणी सुरुवात केली असेल, तर ती शरद पवारांनी केली. पहिल्यांदा काँग्रेस फोडली त्यांनी आणि मग पुलोद म्हणून स्थापन केलं. ७७-७८ साली पुलोद स्थापन केलं. पहिल्यांदा महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचं फोडाफोडीचं राजकारण सुरु झालं, ते शरद पवारांनी या गोष्टीची सुरुवात केली.या सभेत राज ठाकरे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच श्रीकांत शिंदे यांच्या वक्तव्यावर भाष्य करताना मिश्किल टिप्पणी केली. राज ठाकरे यांनी भाषणाला सुरुवात केली तेव्हा कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी आणि शिट्ट्या वाजवण्यात आल्या. यावेळी कार्यकर्त्यांना शांत करण्यासाठी राज ठाकरे यांच्या शैलीत म्हणाले, तोंडातली की कूकरची शिट्टी आहे? गप्प बस. यानंतर राज ठाकरे यांनी श्रीकांत शिंदे यांच्या वक्तव्याचा उल्लेख करत महत्त्वाचं आवाहन केलं. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितलं की, फेविकॉलचा जोड आहे. पण पुढच्यावेळेला आम्हाला आतून लावा. नाहीतर नेहमी आमची बाजू बाहेरच, असे म्हणत राज ठाकरेंनी श्रीकांत शिंदेंना मिश्किल टोला लगावला.राज ठाकरे म्हणाले की, आज इथे ठाण्यात आल्यावर आनंद मठामध्ये गेलो. तिथे गेल्यानंतर सर्व जुने दिवस आठवायला लागले. माझे आणि आनंद दिघे यांचे एक वेगळ्याप्रकारचे मैत्रीचे संबंध होते. मी पूर्वी त्यांना सांगायचो, जेव्हा तिथे जायचो तेव्हा सांगायचा अहो स्वच्छ ठेवाओ. कुठे कुंकू पडलंय, कुठे काय, त्याच्यातच झोपायचे. आज गेलो तर लक्षातच आलं नाही की मी याच वास्तूत आलोय. त्यांच्याबरोबर तेव्हा ठाणे फिरताना मजा यायची. तेव्हा ठाणं टुमदार होतं. मी लहानपणी बाळासाहेबांबरोबर किती वेळा आलो. तेव्हा रात्री १२ ते १ वाजेपर्यंत सभा चालायच्या. त्यावेळी व्यासपीठं एवढे मोठे नसायची, असं राज ठाकरे म्हणाले.राज ठाकरे म्हणाले की, कोणी एकेकाळी नाही. ३० ते ३५ वर्षांचा काळ असेल. पण अशी टुमदार शहरं उभी राहिली पाहिजे. हा ठाणे जिल्हा देशातीलमी काय बोलतो ते लक्षात ठेवा. ठाणे



लोकसभा, कल्याण लोकसभेची संयुक्त सभा आहे. मी गेल्या अनेक वर्षापासून सांगतो आज वेगवेगळ्या राज्यातून लोक येत आहेत. तुम्ही कितीही काम करा, कितीही रस्ते बांधा, पूल बांधा. तुम्ही बाहेरचे लोंढे थांबणार नाही, तुम्ही कितीही विकास केला तरी या शहरात काही घडणार नाही. खासदार श्रीकांत शिंदे आणि म्हस्के यांनी कितीही फंड आणले तरीमी फक्त ठाणे जिल्ह्याबद्दल बोलतो. सर्व बाहेरून लोकं येत आहेत. सर्वांत जास्त प्रमाण ठाणे जिल्ह्यात आहे, असे राज ठाकरे म्हणाले.राज ठाकरे म्हणाले की, मला काही गोष्टी पटल्या नाही त्यामुळे विरोध केला. पण ज्या गोष्टी मला पटल्या त्याचे मी कौतुक देखील केले आहे. महाराष्ट्रातील खासदारांना माझे सांगणे आहे की, देशाच्या विकासाबरोबरच सुरक्षेचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. दहशतवादी ज्या पद्धतीने मुंब्रा येथे राहून आधार घेत आहेत. त्यांचा उद्धव ठाकरेंना पाठिंबा मिळतो. देशाच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यामुळे मतदारांनी देखील विचार केला पाहिजे. मुंब्रा येथे संसदेतील हल्ल्यापासून बॉम्बस्फोट हल्ल्यातील आरोपी या मुंब्रा येथे राहत होते. त्यामुळे सावध व्हा. परंतु, यामध्ये कधीही चांगला मुस्लिम भरडला गेला नाही पाहिजे, विकासाबरोबरच सुरक्षा ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे, असे म्हणत श्रीकांत शिंदे व नरेश म्हस्के यांना निवडून द्या, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले.राज ठाकरे पुढे म्हणाले की पुण्यात फतवे काढले गेले. महाविकास आघाडीला मतदान करावं. का तर गेल्या दहा वर्षात वाह्यातपणा करता आला नाही. त्यासाठी त्यांना पाठिंबा दिला जात आहेत. काही मुस्लिम चांगले आहेत. त्यांना दंगे नको आहेत. पण काही वाह्यात लोकं आहेत. मी जे दाखवतोय ते फक्त एका मुंब्र्याची गोष्ट सांगतो. मुंब्र्यातील सीमीचे सहा अतिरेक्याला अटक. संसदेवर हल्ला झाला त्याचा गुन्हेगार मुंब्र्यात सापडला. हिजबूल मुजाहिदीनला मुंब्र्यातून अटक, इशरत जहाँ शेख मुंब्र्यात राहत होती. लष्कर ए तोयबाचा अतिरेकी मुंब्रा, पॉप्युलर फ्रंटच्या चौघांना मुंब्र्यातून अटक. पॅलेस्टाईनला पाठिंबा देण्यासाठी मुंब्र्यात निदर्शन झाले. आयसीसीच्या अतिरेक्याला अटक. यावर दैनिक सामनातून अग्रलेखही लिहिला होता. पण, आता नाही बोलणार. आयएसआय आणि तोयबाशी संबंध असल्याच्या संशयावरून मुंब्र्यातून एकाला अटक केली. टाटा इन्स्टिट्यूटचा अहवाल. त्यात मुंब्र्यावर चिंता व्यक्त केली आहे. हे आपल्या आजूबाजूला सुरू आहे. लांबचं सांगत नाही. काही सुरक्षेचा विषय नाही.या सर्व परिस्थित गेल्या दहा वर्षात जर एक गोष्ट चांगली घडली आहे. या लोकांना जास्त डोकं वर काढलं तर चेचले जाऊ अशी भीती वाटत आहे. म्हणून काँग्रेसला पाठिंबा देत आहे. आमदार, खासदार आणि नगरसेवकांना सांगणं आहे की तुम्ही सतर्क राहा. पण चांगला मुसलमान भरडला जाणार नाही हे पाहिलं पाहिजे. विकासाबरोबरच सुरक्षा महत्त्वाची आहे. मी श्रीकांत या पुढे, नरेश यांच्याशी बोलणार आहे. येणाऱ्या २० मे रोजी निवडणूक होणार आहे. तेव्हा यांना विजयी करा. आज मी जे काही सांगितलं त्याच्या पुढच्या भागावर मी त्यांच्याशी बोलणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले.

## प्राथमिक शिक्षकांच्या समस्या अधिवेशनात मांडाव्या

### शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांना पुरोगामीचे निवेदन

**मूल । प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित असून त्या सोडवण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून न्याय मिळवून द्यावा , अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना यांनी शिक्षक आमदार सुधाकर अडबाले ,विधानपरिषद महाराष्ट्र राज्य यांना नुकतेच दिले असून प्राथमिक शिक्षकांच्या समस्यांना राज्य विधिमंडळ अधिवेशनात प्राधान्याने मांडण्याचे आश्वासन आमदार सुधाकर अडबाले यांनी दिले .

निवेदनात संगणक एम एस सी आय टी चा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यात यावा.१०० पटास एक मुख्याध्यापक देण्यात यावा,सर्व विषय शिक्षकांना समान वेतनश्रेणी देण्यात यावी ,चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांचे नियमित वेतन करण्यात यावे,सर्व पदोन्नत्या तात्काळ करून रिक्त पदे भरण्यात यावी.याकरिता पुढील अधिवेशनात तारांकित प्रश्न मांडावे असे अनेक विषय चर्चिण्यात आले .शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शिक्षक समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सूतोवाच केले .याप्रसंगी पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती चे मार्गदर्शक दीपक वऱ्हेकर,जिल्हा सरचिटणीस सुरेश गीलोरकर, कार्यकारी सचिव दिवाकर वाघे , राज्यनेते विजय भोगेकर,रवी झाडे आदी उपस्थित होते.



## पुरोगामी पत्रकार संघ,भद्रावती ची नवीन कार्यकारिणी जाहीर

### पुरोगामी पत्रकार संघ,भद्रावतीच्या अध्यक्ष डॉ.ज्ञानेश हटवार उपाध्यक्ष मनोज मोडक यांची नियुक्ती

**भद्रावती । प्रतिनिधी**

पुरोगामी पत्रकार संघ, भद्रावतीची हॉटेल सनी पॉइंट भद्रावती येथे बैठक आयोजित करण्यात आली.त्यात सर्वानूमते नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. पुरोगामी पत्रकार संघ, भद्रावतीच्या अध्यक्षपदी डॉ.ज्ञानेश हटवार यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष मनोज मोडक, सचिव प्रवीण चिमूरकर, कोषाध्यक्ष-शिरीष उगे, संपर्कप्रमुख - हर्षल रामटेके , प्रसिद्धीप्रमुख-आशिष कोटकर, सदस्य म्हणुन उमेश कांबळे यांची निवड करण्यात आली.नवनियुक्त पुरोगामी पत्रकार संघ, भद्रावतीच्यावतिने नवीन शैक्षणिक वर्षांत जि.प.शाळेतील मुलांना शालेय साहित्य वितरण करण्याचे ठरविण्यात आले.



## आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना भारमुक्त करण्याची पुरोगामी संघटनेची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

सन २०२३ मध्ये आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना पवित्र पोर्टल ची भरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर भारमुक्त करण्याचे शासनाचे निर्देश होते पण लगेच लोकसभा निवडणूकीची आचार संहिता लागल्याने आंतरजिल्हा बदली शिक्षकांना भारमुक्त करण्यात आले नाही. शासनाने पवित्र पोर्टल द्वारे शिक्षक भरती करुन त्यांना पदस्थापना देण्याचे नियोजन केले आहे व काही जिल्हा परिषद ने पदस्थापना केलेली आहे.

आपल्या गावापासून नोकरीसाठी कोसो दूर आलेले शिक्षक कुटूंबापासून बरीच वर्ष विभक्त राहिले आहेत. शासनाच्या ऑनलाइन आंतरजिल्हा बदली प्रक्रियेने त्यांची गावाकडे नोकरी करण्याची स्वप्न पूर्ण होत आहे पण आचारसंहितेच्या अडवणूकीने काही काळासाठी स्वप्न धुसर झालेली आहेत. आपल्या गावाकडे बदली झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत असताना आचार संहितेने खोडा घातल्यामुळे भारमुक्त होण्यास ४ जुन २०२४ ची वाट पाहावी लागणार आहे. आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना त्वरीत भारमुक्त करुन त्यांना स्वजिल्ह्यात जाण्याची व पदस्थापना घेण्याची संधी द्यावी अशी मागणी पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांचेकडे एका निवेदनाद्वारे व चर्चद्वारे केली आहे. आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना बरीच वर्ष आईवडीलांपासून दूर राहावे लागले. आंतरजिल्हा बदली ने आता त्यांना आपल्या कुटुंबात राहायला जाण्याची संधी प्राप्त झालेली आहे. सांगली चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ९ मे २०२४ ला आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना भारमुक्त केल्याचे आदेश निर्गमीत केले आहे. बदली झालेल्या शिक्षकांना त्यांच्या मुलांची एडमिशन घेणे व कुटुंब स्थावर करणे यासाठी बराच अवधी लागणार आहे. त्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील आंतरजिल्हा बदली झालेल्या ४७ शिक्षकांना त्यांची समस्या लक्षात घेऊन १५ मे २०२४ पर्यंत त्वरीत भारमुक्त करावे अशी संघटनेची मागणी आहे.

## चारचाकी वाहनाची दुचाकीला धडक

### अपघातात पतीचा मृत्यू, पत्नी गंभीर

**चिमूर । प्रतिनिधी**

तेंदूपत्ता संकलन करून गावाकडे परतणारे दुचाकीस्वार व चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला. हा अपघात भयावह असल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला तर पत्नी गंभीर जखमी झाली. अपघातानंतर दुचाकीनेही पेट घेतला. ही थरकाप उडविणारी घटना चिमूर-कान्पा राज्य महामार्गावरील शंकरपूर येथून ४ किलोमीटर अंतरावरील डोमा वळण रस्त्यावर सोमवार, १३ मे रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली.



श्रावण बापुराव गुरूनुले असे मृतकाचे नाव असून, कल्पना गुरूनुले असे जखमीचे नाव आहे. जखमीला चिमूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. सद्या ग्रामीण भागात तेंदूपत्ता हंगाम सुरू आहे. उन्हाळ्याच्या दिवसात पोटाची खळगी भरण्यासाठी गावातील नागरिक तेंदूपत्ता संकलनासाठी जातात. डोमा येथील श्रावण गुरूनुले गावातील अन्य सहकाऱ्यांसोबत लावारी जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेले होते.परतीच्या मार्गावर असताना डोमा वळण रस्त्यावर वाहनावरील नियंत्रण सुटल्याने चारचाकी व दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात पतीचा जागीच मृत्यू तर पत्नीला गंभीर दुखापत झाली आहे. घटनेनंतर तप्त उन्हात अपघातग्रस्त दुचाकीने पेट घेतला. ही दुचाकी पूर्णतः जळून खाक झाली. दरम्यान, चारचाकी वाहन चालकाला शंकरपूर येथील बसस्थानकावर अडविण्यात आले. वाहन जप्त करून चालकाविरूद्ध शंकरपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चिमूर उपजिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास शंकरपूर पोलिस करीत आहेत.

## शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची त्वरित द्या : दिनेश चोखारे

### भूमिपुत्र संघटनेचे अप्पर जिल्हाधिकारी देशपांडे यांना निवेदन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सन २०२२-२०२३ या वर्षाचे नुकसान भरपाई झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम त्वरित मिळावी अशी मागणी भूमिपुत्र संघटनेचे दिनेश दादापाटील चोखारे यांनी केली आहे.भूमिपुत्र संघटनेचे १४ मे ला अप्पर जिल्हाधिकारी देशपांडे यांना निवेदन सादर केले.

त्यात त्यांनी म्हटले आहे कि, संपूर्ण जिल्ह्यात सन २०२२-२३ मोठ्या प्रमाणात पूर बाधित शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले होते. शासनाने यादीत तयार करताना प्रत्येक तालुक्यावर यादी तयार केली होती. शासनाचे नवीन धोरणानुसार ई के वाय सी करणे गरजेचे होते. अनेक शेतकऱ्यांना ई के वाय सी ची माहिती नसल्याने ई के वाय सी करणे बाकी आहे, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सुद्धा अजूनपर्यंत ई के वाय सी केली नसल्याने आर्थिक मदत मिळाली नाही आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी ई के वाय सी केली त्याना सुध्दा अजून पर्यत आर्थिक मदत मिळाली नाही , लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून देण्यात यावी. शेतकऱ्यांना आपल्या माध्यमातून ई के वाय सी करण्यासाठी आपल्या स्तरावरून शेतकऱ्यांना माहिती देऊन ,ई के वाय सी करण्यास मदत करावी अशी मागणी निवेदनातून केली आहे.निवेदन देतांना सचिन राजूरकर, गणेश आवारी, प्रमोद बोरीकर, यांनी उपस्थिती होती.



# बंद करा भ्रष्टाचार! कटाक्षाने पाळा शिष्टाचार!!

**शिष्टाचारांच्या माध्यमातून समाजातील वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यातील परस्परसंबंधांना समाजमान्यता व पुष्टी प्राप्त होते. त्याचप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या स्तरांमधील सामाजिक अंतर टिकून राहते. शिष्टाचारांचे स्वरूप कृत्रिम भासत असले, तरी त्यांचा सामाजिक आशय महत्त्वाचा असतो. ज्या व्यवहारांमध्ये शिस्त व औपचारिकतेची निकड असते, तेथे शिष्टाचारांचे पालन काटेकोरपणे करण्यात येते. उदा. सैनिकी दलांत शिष्टाचार काटेकोरपणाने पाळण्याची गरज असते. उद्बोधक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख... संपादक.**

समाजातील सभ्यतापूर्ण व्यक्तिवर्तनाची प्रथा वा संकेत म्हणजे शालिनता- शिष्टाचार होय, असे सामान्यपणे म्हणता येईल. प्रत्येक समाजात शिष्टाचार आढळतो. मात्र प्रत्येक समाजातील शिष्टाचाराचे स्वरूप स्वतंत्र असते. समाजातील शिष्टजन-एलीट्स यांचा जो वर्ग असतो, त्याचे वर्तन किंवा आचार समाजातील इतर वर्गांना अनुकरणीय वाटतात. शिष्टाचाराच्या कल्पनेत असा एक अर्थ आहेच. एकाच समाजातील स्त्री-पुरुषांच्या विविध प्रकारच्या गटांत व्यावसायिक वर्गात किंवा इतर प्रकारच्या समूहातही विशिष्ट प्रकारचे शिष्टाचार रूढ असतात. समाजशास्त्रीय दृष्टीने व्यक्तीचे सामाजिक वर्तन किंवा आचार नियंत्रित करण्याचे शिष्टाचार हे एक साधन असते. किंग्जली डेव्हिस या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाच्या अभिप्रायानुसार शिष्टाचार हे विशिष्ट प्रकारचे लोकाचार होत. त्यांना सखोल अर्थ नसला, तरी सामाजिक संबंधांचे स्वरूप सुखावह व शिस्तबद्ध व्हावे, म्हणून त्यांचे पालन करण्यात येते. शिष्टाचार पाळण्याबाबत प्रत्येक व्यक्तीवर तिची जात, जमात, वर्ग, व्यवसाय इत्यादींचे दडपण असते. शिष्टाचार शिकणे व त्यांचे पालन करणे, या प्रक्रियांमुळे प्रत्येक व्यक्तीचा दर्जा, भूमिका व प्रतिष्ठा यांबाबतचे महत्त्वपूर्ण संकेत स्पष्ट होतात. शिष्टाचारांचे उल्लंघन केल्यास समाजाचा रोष व टीका ओढवून घेण्याचा धोका व बहिष्कृत होण्याची भीती असते. समाजातील श्रेणीव्यवस्थाही शिष्टाचारांतून सूचित होते. शिष्टाचारांमुळे व्यक्तीला विशिष्ट समूहातील सदस्य असल्याची जाणीव होऊन तिची अस्मिता जागृत होते.

राष्ट्रीय दिन दिनदर्शिका- नॅशनल डे कॅलेंडरमधील रजिस्ट्रारने दरवर्षी १४ मे रोजी राष्ट्रीय शालीनता दिन अर्थात राष्ट्रीय शिष्टाचार दिन घोषित केला आहे. शिष्टाचारांच्या माध्यमातून समाजातील वरिष्ठ व कनिष्ठ यांच्यातील परस्परसंबंधांना समाजमान्यता व पुष्टी प्राप्त होते. त्याचप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या स्तरांमधील सामाजिक अंतर टिकून राहते. शिष्टाचारांचे स्वरूप कृत्रिम भासत असले, तरी त्यांचा सामाजिक आशय महत्त्वाचा असतो. ज्या व्यवहारांमध्ये शिस्त व औपचारिकतेची निकड असते, तेथे शिष्टाचारांचे पालन काटेकोरपणे करण्यात येते. उदा. सैनिकी दलांत शिष्टाचार काटेकोरपणाने पाळण्याची गरज असते.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

मध्ययुगीन यूरोपीय समाजामध्ये शिष्टाचारांचे स्तोम माजले होते. एमिली पोस्ट या प्रतिष्ठित घराण्यातील स्त्रीने सामाजिक आंतरसंबंधांमध्ये परस्परांचा आदर केला जावा, यासाठी कोणते शिष्टाचार अंगी बाणवावे, असे सांगितले आहे. भारतीय समाजातील विविध वर्ग, जाती, जमाती, धार्मिक संप्रदाय व पंथ यांच्या वर्तनांवर कठोर बंधने होती. विशेषतः स्त्री व पुरुषांमधील परस्परसंबंधांचे शिष्टाचार पाळणे अत्यावश्यक समजले जाई. उच्चवर्गीय स्त्रियांच्या बाबतीत निर्बंध अधिक कडक असत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक परिवर्तनाला गती लाभून वर्ग, जात, जमात यांमधील पारंपरिक अंतर कमी झाले. प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा मान ठेवून व अधिकारांची जाणीव राखून कसे वर्तन करावे, याबद्दल माणसाने नेहमी जागरूक असले पाहिजे. विसाव्या शतकातच राजकारण, धर्म व लष्करांसारखी क्षेत्रे सोडता, सर्वसामान्य व्यक्तीवरील सर्वच पारंपरिक वर्तनप्रकारांची दडपणे हळूहळू कमी होत गेली. आधुनिक समाजात व्यक्तिस्वातंत्र्य, वैयक्तिक हक्क, सामाजिक समता व न्याय यांसारख्या मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले. लोकशाही समाजात वर्तनपद्धती कालबाह्य होत गेल्या. परंपरागत शिष्टाचारांचा प्रभावही कमी होत गेला. अर्थात नवे शिष्टाचारही याबरोबरच रूढ होत आहेत, हेही खरे. त्यातून व्यक्तीच्या सामाजिक व्यवहारातील वर्तनासंबंधीचे काही प्रतीकात्मक संदर्भ टिकून राहिले आहेत.भारतात आपण पिळवणूकीच्या अर्थकारणात बांधलो गेलो आहोत, तेथून जेव्हा सर्वांची सुटका होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपला देश स्वतंत्र होईल. पिळवणुकीचे अर्थकारण राज्यकर्त्यांपासून सुरु होते. पोलिस, आयकर, अबकारी, कर, सीमाशुल्क आदी विभागात ठराविक जागी बदली होण्यासाठी लाख रूपयांची राज्यकर्त्यांना लाच दिली जाते. जो पोलिस अधिकारी अथवा आयकर आधिकारी एवढा खर्च करतो, त्याला त्याची वसुली करायची असते. त्यातूनच भ्रष्टाचाराचा उगम होतो. समाजाच्या वरच्या मजल्यावरून सुरू झालेला भ्रष्टाचार हळूहळू खाली पसरतो. जेव्हा सामान्य नागरिकांचा सरकारी यंत्रणेशी संबंध येतो तेव्हा प्रत्येक कागदासाठी त्याला किंमत मोजावी लागते. शाळा, इस्पितळे, व्यापार, अशा जीवनावश्यक सेवांमध्येही नागरिकांची पिळवणूक होते. हे अगदी योग्य शब्दांत भारतातील भ्रष्टाचाराचे विश्लेषण आहे. पिळवणुकीचे अर्थकारण राज्यकर्त्यांपासून सुरु होते, हे त्यांचे वक्तव्य अचूक आहे. आज निवडणुकांत आचारसंहिता लागू असूनही, मी निवडून आलो पाहिजे म्हणून उमेदवार मतदारांना पैशांच्या रूपात लाच देत आहेत, कपडेलत्ते, अन्नधान्याचे मोफत वाटप करीत आहेत. सध्या राज्यातच नव्हे तर अवघ्या देशात गाजत असलेला आदर्श इमारतीचा घोटाळा याचे मूर्तीमंत उदाहरण ठरावे. एक आजी, दोन माजी मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्य मंत्री असे कितीतरी राजकीय नेते या घटाळ्यात अडकले आहेत. जर मंत्री एवढे खोलवर रुतले असतील तर सनदी अधिकारी व इतर वेगवेगळ्या प्रशासकीय विभागाचे कितीतरी अधिकारी अडकले असतील. राष्ट्र वा राज्य चालविणारे प्रतिनिधी जर भ्रष्टाचारी निघाले तर अधिकारी वर्ग मागे कसा राहील? हे दुष्टचक्र खूपच दुर्दैवी आहे. जणू भ्रष्टाचारच हा शिष्टाचार झाला आहे, असे वाटते; नाही का?

!! राष्ट्रीय शिष्टाचार दिनाच्या सर्व भावाबहिणींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# माझ्या आयुष्यातील ही पाचवी निवडणूक:आता संसदेत गेल्यावरच काहीतरी वेगळे वाटेल

## मतदानापूर्वी पंकजा मुंडे यांनी व्यक्त केल्या भावना

**बीड**-माझ्या आयुष्यातील ही पाचवी निवडणूक आहे. त्यामुळे आता संसदेत गेल्यावरच काहीतरी वेगळे वाटेल अशा भावना भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत. आज बीड मतदारसंघासाठी मतदान पार पडणार आहे. मतदान करण्यापूर्वी पंकजा मुंडे यांचे कुटुंबाकडून औक्षण करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या, ''माझ्या राजकीय जीवनामध्ये ही पाचवी लोकसभा आहे. यंदा फक्त मी नामनिर्देशन केले एवढाच फरक आहे. प्रीतम मुंडे निवडणुकीला उभ्या होत्या तेव्हा जे कष्ट केले तेच आता सुद्धा केले आहेत. माझ्यासाठी ही पाचवी निवडणूक आहे मात्र मी संसदेत दाखल होईल तेव्हाच काहीतरी वेगळेपण वाटेल'', असे पंकजा म्हणाल्या.पुढे त्या म्हणाल्या, ''४०० पारचा नारा पूर्ण होईल का नाही अशी शंका सर्वांना होती. मात्र पंतप्रधान मोदींनी हा नारा दिला आहे तर नक्कीच पूर्ण होईल. गेल्या चार राज्यात झालेल्या निवडणुकीत लागलेला निकाल देखील अनपेक्षित होता. देशातील जनता सुज्ञ आहे. पूर्ण विचारपूर्वक जनता मतदान करणार आणि योग्य सरकार निवडून देईल'', असा विश्वास पंकजा यांनी व्यक्त केला.पुढे त्या म्हणाल्या, ''जात आणि धर्म या विषयांच्या पलीकडे जाऊन मतदान करत आलेला बीड जिल्हा पुन्हा एकदा तसंच करेल.. प्रत्येक निवडणुकीमध्ये वेगळे आव्हान



असते. विविध विषय उभे केले जातात मात्र सत्य लोकांसमोर आहे आणि हे सत्य पडताळूनच जनता मतदान करेल''. याशिवाय मुंडे साहेब होते तेव्हा आम्ही सर्व एकत्र मतदानाला जायचो. मात्र आता ते नसले तरी त्यांचे आशीर्वाद आहेत'' असे पंकजा म्हणाल्या.तसेच मी राजकारण करत असताना कधी कोणाबद्दल वाईट टिपण्णी केली नाही. वाईट विधाने केली नाहीत. मी विकासाचे आणि विचारांचे राजकारण करते त्यामुळे माझ्या मागे जनता नक्की उभ राहणार असे पंकजा म्हणाल्या. दरम्यान, बीडमध्ये महाविकास आघडीकडून बजरंग सोनवणे पंकजा मुंडे यांच्यासमोर निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# राज ठाकरेंच्या राजकारणाचा शेवट जवळ:आग लावण्याची कामं आता बंद करावीत-आव्हाड

**मुंबई**-दोनच विषय घेऊन राज ठाकरे अनेक वर्षे महाराष्ट्रात राजकारण करत आहेत. त्यांच्या राजकारणाचा शेवट आता जवळ आला आहे अशी बोचरी टीका राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. तसेच ज्या विषयांवर ते कायमच बोलत आले आहेत तेच विषय कळव्यातल्या भाषणातही होते. म्हणून त्यांची एकही जागा निवडून येत नाही असा घणाघातही जितेंद्र आव्हाड यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर केला आहे. जितेंद्र आव्हाड यांनी राज ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. ते म्हणाले, ''दोनच विषय घेऊन राज ठाकरे अनेक वर्षे महाराष्ट्रात राजकारण करत आहेत. हे विषय घेऊन ते पुढे जाऊ शकत नाहीत. त्यांच्या राजकारणाचा शेवटच मला दिसतो आहे. आग लावण्याची कामं बंद करा, समाज मूर्ख राहिलेला नाही. जनतेलाही सर्व काही समजते. परप्रांतीय आणि मुस्लिम यांना टार्गेट करून हिंदू मतं मिळतील असं वाटत असेल तर तसं ते होत नाही हे राज ठाकरेंनी लक्षात ठेवावे'', असा सज्जड दम जितेंद्र आव्हाड यांनी भरला आहे.पुढे आव्हाड म्हणाले, ''राज ठाकरेंनी कळव्यात येऊन भाषण केले. महायुतीचा प्रचार करताना त्यांनी नवीन कुठला मुद्दा पुढे आणला का? किंवा काही खास बोलले का? ज्या विषयांवर ते कायमच बोलत आले आहेत तेच विषय कळव्यातल्या भाषणातही होते. म्हणून त्यांची एकही जागा निवडून येत नाही. राज ठाकरे बोलतात मुस्लिमांना सरळ केले पाहिजे, परप्रांतीयांना सरळ केले पाहिजे. त्यांना कुणीतरी सुपारी दिली आहे का? हिंदू-मुस्लिम, परप्रांतीय विरुद्ध मराठी अशी भांडणंच करत बसायची का महाराष्ट्रात?'', असा खोचक सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.पुढे आव्हाड म्हणाले, ''देशाची आर्थिक परिस्थिती, बेरोजगारी, पेट्रोल-डिझेलचे दर, जगात भारताचा निर्देशांक कुठे गेला आहे? श्रीमंत कोण झाले आहेत, गरीब कोण आहेत? किती लोकांच्या हातात भारतातली संपत्ती आहे? त्यावर राज ठाकरे कधी बोलणार? शेती, उद्योग यावर राज ठाकरे कधी बोलणार? मुस्लिम आणि परप्रांतीय एवढेच मुद्दे आहेत का? मराठी पोरांना नोकऱ्या मिळत नाहीत यावर बोलणार का? मुंबईतील मुख्यालये दिल्ली आणि गुजरातला हलवली आहेत त्याबद्दल ते शांत का?'', असे अनेक प्रश्न आव्हाड यांनी उपस्थित केले आहेत.

# सत्ताधाऱ्यांची पोलिंग एजेंट बनून मतदान केंद्रात मनमानी:अमोल कोल्हेंचे गंभीर आरोप,व्हिडिओ शेअर करत केली कारवाईची मागणी

**पुणे**-राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी शिरुर मतदारसंघात सत्ताधारी पक्षाकडून दबावतंत्राचा वापर होत असल्याचा आरोप केला आहे. आज चौथ्या टप्प्यात पुण्यात मतदान पार पडत आहे. मात्र तत्पूर्वीच शरद पवार गटाच्या उमेदवारांकडून भाजपवर गंभीर आरोप केले जात आहेत. अहमदनगरमधील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनीही भाजप तालुकाध्यक्षकांडून पैशांचे वाटप होत असल्याचा आरोप केला आहे. तर आमदार रोहित पवार यानींही अहमदनगर लोकसभा मतदार संघात उन्हाळ्यातही पैशांची धुवांधार बरसात होत असल्याचा आरोप केला आहे.

अमोल कोल्हे यांनी एक ट्विट करत खळबळजनक आरोप केला आहे. ते म्हणाले, ''शिरूर लोकसभा मतदारसंघात प्रशासनाची अनागोंदी.. सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्तेच पोलिंग एजेंट बनून सरळसरळ थेट मतदान केंद्रात मनमानी कारभार करत आहेत!'', असा दावा अमोल कोल्हे यांनी केला आहे. त्यांच्या या ट्विटची जोरदार चर्चा रंगली असून त्यांनी यासह एक व्हिडिओ देखील शेअर केला आहे.

घड्याळ चिन्ह असलेल्या स्लीपांचे वाटप याशिवाय शिरूर लोकसभा मतदारसंघात ठिकठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षातर्फे बुथच्या परिसरात घड्याळ चिन्ह असलेल्या स्लीपांचे वाटप करण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. मतदानाच्या दिवशी निवडणूक चिन्हाचा प्रचार केल्याने आचा रसंहितेचा भंग होत आहे'', असे कोल्हे यांनी म्हटले आहे.तसेच आपण शिरूर लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा क्षेत्रातील बुथ परिसरातील घड्याळ चिन्ह असलेल्या स्लीपांचे वाटप बंद करण्याचे तसेच संबंधित पक्षाच्या राजकीय कार्यकर्त्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश पोलिस प्रशासनाला द्यावेत'', अशी विनंतीही अमोल कोल्हे यांनी ट्विटरवरुन केली आहे.दरम्यान, आज कोल्हे यांनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी बोलताना त्यांनी आदरणीय साहेब माझ्या पाठिशी आहेत. शरदचंद्र पवार यांच्यावर प्रेम करणारी शिरुरची जनता आहे. उद्धव ठाकरे यांचा कडवट शिवसैनिक पाठिशी आहे. महाविकास आघाडी दौदीप्यमान असा विजय मिळवेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

# प्रचाराच्या शेवटच्या दिवशी युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांनी अंबाजोगाई शहरातील विविध प्रभागात लावला कॉर्नर बैठकांचा धडाका

## शहरातील मिलिंद नगर, क्रांती नगर, समता नगर परिसरात कॉर्नर बैठक घेऊन ना.बनसोडे यांनी नागरीकांना पंकजा मुंडे यांना मतदान करण्याचे केले आवाहन

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

राज्यातील चौथ्या टप्प्यातील मतदान प्रचाराच्या तोफा शनिवारी संध्याकाळी थंडावल्या. संध्याकाळ पासून शहरात विविध ठिकाणी विविध नेत्यांकडून कॉर्नर बैठकांचे सत्र सुरू झाले . यामध्ये अंबाजोगाई शहरदेखील आघाडीवर दिसून आले. अंबाजोगाई शहरात राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी राज्याचे युवक कल्याण तथा बंदरे विकास मंत्री ना संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने अंबाजोगाई शहरातील मिलिंद नगर, क्रांतीनंतर, त्याचबरोबर परळी वेस परिसरातील समता नगर येथे कॉर्नर बैठका आयोजित केलेल्या होत्या. या बैठकीस लातुर महानगर पालिकेचे माजी महापौर ॲड व्यंकटराव बेदरे, शहराचे माजी नगरसेवक सुनील वाघाळकर , महादेव आदमाणे, खालेद चाऊस, धम्मा सरवदे, संतोष शिनगारे, दिनेश भराडीया, राजू मोरे, रुपेश चव्हाण, काझी खयामोद्दीन, उज्जेन बनसोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.मिलिंद नगर येथील बैठक माजी नगरसेवक धम्मा सरवदे यांनी , क्रांती नगर येथील महादेव आदमाणे यांनी तर समता नगर येथील बैठक भारत जोगदंड यांनी आयोजित केली होती.

या कॉर्नर बैठकीत राजू मोरे, महादेव आदमाणे यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की आपल्या भागात किंवा आपल्या शहरात राजकिशोर मोदी हेच आपले उमेदवार आहेत असे समजावे कारण आपल्या दैनंदिन जीवनातील आपण कुठल्याही कामासाठी राजकिशोर मोदी यांच्याच कडे जातोय. त्यामुळे मोदी ज्या उमेदवारास मतदान करावयास सांगतील केवळ त्याच उमेदवारास म्हणजेच पंकजा मुंडे यांनाच बहुमताने मतदान करून त्यांनाच विजयी करावे असे उपस्थित सर्व नागरिक मतदारांस सांगितले. यावेळी कांचन सरवदे या महिलेने देखील आपले मत व्यक्त करतांना पंकजा मुंडे यांच्या पाठीशी उभा राहणार असल्याचे सांगितले.लातूर महानगरपालिकेचे माजी महापौर ॲड व्यंकटराव बेदरे यांनीदेखील आपले मत मांडताना बीड जिल्ह्याचा नावलौकिक देशात वाढविण्यासाठी पंकजा मुंडे यांना भारी भरकम मतांनी निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन बेदरे यांनी केले. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वसा पुढे नेण्यासाठी , तसेच चांगला समाज घडविण्यासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन देखील यावेळी ॲड व्यंकट बेदरे यांनी उपस्थित सर्व मतदारांना केले.आपल्या मार्गदर्शनात राजकिशोर मोदी यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली संपूर्ण बीड जिल्हा अतिशय उत्तम प्रकारे काम करताना दिसत आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत पंकजा मुंडे देखील काम करत आहेत.



त्यामुळे आपल्या भागाचा आणखीन चांगला विकास होण्यासाठी आपल्या माणसाला मतदानरुपी आशीर्वाद देण्याची विनंती राजकिशोर मोदी यांनी या बैठकीद्वारे सर्व मतदारांना केली.जिल्ह्यात सुरु असलेल्या जातीपातीच्या घाणेरड्या राजकारणाला बळी न जाता आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने मतदान करा व पंकजा मुंडे यांना बहुमतांनी विजयी करा असे आवाहन देखील राजकिशोर मोदी यांनी उपस्थित मतदारांना केले. या कॉर्नर बैठकीत राज्याचे युवक कल्याण व बंदरे विकास मंत्री ना संजय बनसोडे यांनी उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनींना विस्तृत असे मार्गदर्शन केले.यावेळी त्यांनी तत्कालीन माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांनी सर्वधर्म समभाव सांभाळत सर्वांचा विकास केला.त्याच्याच आदर्शावर आताचे महायुतीचे सरकार काम करत असल्याचे संजय बनसोडे यांनी सांगितले. एका बौद्ध समाजाच्या सामान्य कार्यकर्त्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार करून मंत्रीपदी बसविले .यावरून या महायुतीच्या सरकारची विचारधारा स्पष्ट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांनी राज्य तथा देशासाठी केलेल्या योगदानाबद्दल त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल तर ती त्यांच्या कन्या पंकजा मुंडे यांना मतदान करून व त्यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करूनच दिली गेली पाहिजे असे ठाम मत ना संजय बनसोडे यांनी या बैठकीतून केले. पुढे बोलताना ना संजय बनसोडे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकर्तृत्वाचा देखील गौरव केला. त्यांच्याच काळात गरिबांना मोफत धान्य, मोफत शिक्षण , मोफत आरोग्य, शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे नरेंद्र मोदी हेच यापुढेही देशाला अत्युच्च शिखरावर पोचवू शकतात तेव्हा त्यांना तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान त्याचबरोबर त्यांच्याच मंत्रिमंडळात देशाच्या मंत्री म्हणून काम करण्यासाठी त्यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन याप्रसंगी संजय बनसोडे यांनी उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनींना केले. याचबरोबर अंबाजोगाई शहरात राजकिशोर मोदी देखील मागील पंचवीस तीस वर्षापासून अंबाजोगाई करांची सेवा करत आहेत. शहराच्या विकासासाठी त्यांनी आतापर्यंत अनेक चांगल्या योजना शहरात राबविल्या आहेत. यापुढेही अशीच साथ तमाम शहरवासीयांनी राजकिशोर मोदी यांना द्यावी व त्यांचा पाठीमागे खंबीरपणे उभे राहून त्यांच्याच सोबत त्यांच्या खांद्याला खांदा लावून पंकजा मुंडे यांना उद्याच्या १३ तारखेला कमळाच्या चिन्हसमोरील बटन दाबून मतदान करण्याचे कळकळीचे आवाहन याप्रसंगी उपस्थित अंबाजोगाई वासीयांना केले. विविध प्रभागातील बैठकांना त्या त्या भागातील युवक , महिला, व जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्याचे दिसून येत होते. या बैठका यशस्वी करण्यासाठी जावेद गवळी, महेबूब गवळी, खलील जाफरी, मतीनं जरगर, विश्वजित शिंदे, दीपक गुंजाळ, सचिन गालफाडे, राहुल वाघमारे, अमोल मिसाळ , धोंडीराम कांबळे, उमेश जोगदंड, बळीराम पाटोळे, कृष्णा पाटोळे, केशव जोगदंड, बालाजी जोगदंड, महेश वेडे आदींनी परिश्रम घेतले.

# शिक्षण आयुक्त कार्यालय बरखास्त करा

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षण आयुक्तांचे शिक्षण विभागावर नियंत्रण नसल्यामुळे शिक्षण विभागातील गैरप्रकार व भ्रष्टाचार चव्हाट्यावर येत आहे. शिक्षण विभागावर नियंत्रण ठेवण्यासाठीच शासनाने शिक्षण आयुक्त कार्यालय निर्माण केले.पण शिक्षण आयुक्त कार्यालयाच्या शिक्षण आयुक्तांचे राज्यातील शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांच्यावर नियंत्रण राहिले नसल्यामुळे हे कार्यालय बंद करून शासनाचा कोट्यावधीचा होणारा खर्च बंद करावा अशी मागणी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष सखाराम कुलकर्णी यांनी शासनाकडे केली आहे.

भावी पिढीचे उज्वल भविष्य बनवणारे व पवित्र असलेला शिक्षण विभाग आहे. असे आपण समजतो. या शिक्षण विभागात गैरकारभार व भ्रष्टाचार होऊ नये म्हणून शिक्षण विभागावर नियंत्रण राहावे यासाठी शासनाने शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथे सुरू केले. शिक्षण आयुक्त कार्यालय सुरू झाले तरी शिक्षण विभागातील भ्रष्टाचार व गैरकारभार थांबला नाही .तर त्यात वाढच होत आहे. सध्या शिक्षण आयुक्त म्हणून सुरज मांढरे कार्यरत आहेत. यांनी शिक्षण आयुक्त पदभार घेतल्यावर सुरूवातीस हे कडक व शिस्तप्रिय असल्याचे एक वर्ष ते चर्चेत होते. पण नंतर सुरज मांढरे यांचे शिक्षण विभागावर नियंत्रण कमी झाले. यांच्या आदेशाचे पालन शिक्षणाधिकारी, शिक्षण उप संचालक करत नाहीत. सर्वसामान्य नागरिकांच्या आलेल्या तक्रारीची चौकशी करण्याचे पत्र आयुक्त यांनी शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांना दिले तर ते अधिकारी कित्येक महिने त्या प्रकरणाची चौकशी न करता आयुक्तांचे पत्र केराच्या टोपलीत टाकतात. ज्या शिक्षणाधिकाऱ्यांनी व शिक्षण उपसंचालकांनी गैर कारभार केला त्याची चौकशी चालू असलेले अधिकारी शिक्षण संचालक किंवा शिक्षण आयुक्त कार्यालयात पदोन्नतीने ठाण मांडून असतात. ही शोकांतिका आहे. एखाद्या अधिकाऱ्यांची चौकशी ज्या अधिकाऱ्याकडे दिलेली असते, त्यापण अधिकाऱ्याच्या गैरकारभाराची चौकशी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे दिलेली असते. त्यामुळे तेरी भी चूप, मेरी भी चूप असे होऊन चौकश्या होतच




नाहीत. असा प्रकार दिसून येत आहे.चौकशी का होत नाही असे आयुक्त कार्यालयात विचारले तर ते सांगतात चौकश्या केल्या तर एकही अधिकारी पदावर राहणार नाही. सर्व सामान्य नागरिकांच्या तक्रारीचे चौकशीचे प्रकरण वर्षानुवर्षे आयुक्त कार्यालयातून शिक्षण संचालक तिथून शिक्षण उपसंचालक तिथून शिक्षणाधिकारी अशी चौकशीचे पत्र फिरत असतात. विशेष प्रकार असा असतो की ज्या अधिकाऱ्यांच्या गैर कारभाराची तक्रार केली त्याच अधिकाऱ्याकडून त्याप्रकरणी स्पष्टीकरण व अहवाल मागितला जातो. सन २०१२ नंतर शिक्षक भरतीवर शासनाने बंधन आणले होते तरी राज्यात नियमबाह्य हजारो शिक्षकांची भरती झाली . वेग वेगळ्या गैरकारभारात ४० च्या जवळपास शिक्षणाधिकारी असल्याचे उघड झाले. पण यांची चौकशी जिथल्या तिथेच. व अजूनही गैर कारभार, भ्रष्टाचार करण्यास राज्यातील बरेच शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक अग्रेसर आहेत .व अशा कारभारावर शिक्षण आयुक्त यांचे नियंत्रण राहिले नसल्यामुळे या आयुक्त कार्यालयावर होणारा कोट्यावधीच्या खर्चाचा भुर्दंड वाचवण्यासाठी शिक्षण आयुक्त कार्यालय बंद करावे.हा पैसा शासनाचा, मंत्र्यांचा नसून जनतेचा आहे. अशा मागणीचे निवेदन सचिव शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांना माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समितीचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष सखाराम कुलकर्णी यांनी दिले आहे .यावर शासन काय निर्णय घेते याकडे शिक्षण विभागाचे तसेच जनतेचे लक्ष लागले आहे.



शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक बापू खांडे यांनी म्हाळस जवळा येथे जाऊन मतदानाचा हक्क बजावला त्यांच्यासोबत शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मानवत पोलिस स्टेशनचे पुलिस निरीक्षक दिपक दंतुलवार साहेब यांना राम कथेचे निमंत्रण देतांना भुषण चांडक, शैलेस कत्रुवार, शिवसेनेचे शहरप्रमूख अनिल जाधव, राजेश कच्छवे, शैलेष वडमारे

# मानवत शहरातील नालीवरील गड्डे व रस्त्याच्या कडेवरील नाम फलक धोकादायक

## नगर पालिका प्रशासनाने खबरदारी घेण्याची गरज




**मानवत । प्रतिनिधी**

मानवत नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रातील सांडपाणी वाहून नेणार्या गटारावरील उघडे खड्डे व रस्त्याच्या काठावरील बॅनर नागरिकांना व वाहन चालकांना धोकादायक बनत चालले असून या कडे कर्तव्यदक्ष नगर पालिका प्रशासनाने लक्ष देऊन उपाय योजना करण्याची गरज सूज्ञ नागरिकातून व्यक्त केल्या जात आहे.

सविस्तर वृत्त असे की,मानवत नगर पालिका शुध्द जल चांगले रस्ते, स्वच्छ व सुंदर शहर म्हणून सफाई मोहिम नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अनेक उपाय योजना राबवित असते. त्यामूळे नागरिकांचे आरोग्य आबादीत राहत आहे. त्यामूळे मराठवाड्यात मानवत नगर परिषदेच्या कार्याची दखल नेहमीच नागरिक घेतात मानवत शहराचा व्याप वाढत असल्यामूळे अनेक नगरांची या मध्ये भर पडत आहे. शहरीकरणामूळे शहरातील अनेक भागात सांडपाणी वाहूण नेणार्या नाल्या व त्यावरील उघडे ढाप्पे आणि शहरातील मेन रोडच्या काठावर व्यापारी व नागरीकांनी लावलेले फलक मात्र अपघातास निमत्रंण देत आहे.

याकडे मानवत नगर परिषदेच्या कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी यांनी शहरातील नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेऊन खबरदारीचा उपाय योजविण्याची गरज सुज्ञ नागरिकांतून व्यक्त करीत आहे.

# भीमराव हत्तीअंबीरे यांना थायलंड येथील समारंभास निमंत्रण

**परभणी**–थायलंड येथील धम्मकाया फाऊंडेशनच्या वतीने बुध्द पोर्णिमे निमित्त आयोजित केलेल्या समारंभास प्रमुख अतिथी म्हणुन संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण भीमराव हत्ती अंबीरे यांना निमंत्रण मिळाले आहे.थायलंड येथील धम्मकाया फाऊंडेशन ही जगातील ३० देशांमधील ७५ पेक्षा अधिक संघटनांसोबत बुध्द धम्माची प्रसार, प्रचार करणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम संस्था आहे. वैशाख डे (बुध्द पोर्णिमा) निमित्त धम्मकाया फाऊंडेशन व थायलंड बुध्दिस्ट ऑर्गनाजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २४ मे दरम्यान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास अनेक देशामधुन हजारो लोक उपस्थित राहतात. प्रमुख अतिथी यांचे जाण्या येण्याचा, राहण्याचा व थायलंड येथील प्रसिध्द धार्मिक स्थळांचा भेटीचा खर्च आयोजकाकडुन करण्यात येतो. याच समारंभाकरीता संबोधी अकादमी महाराष्ट्रचे अध्यक्ष समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे यांना प्रमुख अतिथी म्हणुन निमंत्रित करण्यात आले आहे. दरम्यान, हत्तीअंबीरे यांना हे निमंत्रण मिळाल्याबद्दल डॉ. अरविंद सावते, भगवान जगताप, शेषेराव जल्लारे, सिध्दार्थ भराडे, गौतम मुंढे, भीमराव पतंगे, दि.फ. लोंढे, डि. आर. तुपसुंदर, गौतम साळवे, यादव घोडके, विश्वनाथ डबडे, गौतम कठाळे, भीमराव धबाले, राजेश चांदणे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणवीर, हेमंत घुगे, त्रिशरण वाटोडे, सुरेश मगरे, सचिनराजे हत्तीअंबीरे, अविनाश मालसमींदर, नवनाथ जाधव, दिलीप पाटील, भगवान मानकर, बद्रीनाथ घुले, रामप्रसाद घुगे, बालाली भुसारे, अनिरुध्द धरपडे आदींनी अभिनंदन करुन शुभच्छा दिल्या आहेत.

# लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती यापासून दूर असलेल्या राज्यकर्त्यांना कायमचे घरी पाठवा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती यापासून दूर असलेल्या व महात्मा गांधीजी यांच्या लोकभज्ञाक तत्त्वाशी विसंगत वागणाऱ्या राज्यकर्त्यांना कायमचे घरी पाठवणे हाच देशातील जनतेसमोरील राजमार्ग असल्याचे लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. तर शहराला असलेले औरंगजेबाचे नाव बदलून नामांतर करणाऱ्या सध्याच्या राजकारण्यांचे वागणे प्रत्येक बाबतीत औरंगजेबासारखेच असल्याचा आरोप करण्यात आला आहे. भारतात गेली ५ हजार वर्षे लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या महान तत्वांचा उद्घोष करण्यात आला. महात्मा गांधीजींनी या लोकभज्ञाक तत्त्वातील प्रचंड शक्ती ओळखून इंग्रजांविरुध्द व्यापक आंदोलन केले. त्याचा परिणाम या देशातून इंग्रज गेले, परंतु गेल्या स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षात गोरे इंग्रज गेले, परंतु काळ्या अप्पलपोट्या राज्यकर्त्यांनी संपूर्ण देश खाऊन टाकला आहे. कुटुंबाची सत्ता राहण्यासाठी गांधीजींचे तत्व देखील पायदळी तुडविणाऱ्या प्रवृत्तींना सार्वजनिक जीवनातून निवृत्त करणे आणि त्यासाठी त्यांच्या विरुद्ध डिच्चू कावा करणे हाच एक मार्ग मतदारांसमोर असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.अजित पवारांच्या कोट्यावधीच्या घोटाळ्याबाबत ईडीचा दम देणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पवारांना फोडून आपल्या तंबूत आणले. त्याचबरोबर गांधी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्यांनी सत्तेसाठी त्यांच्या तत्वाचा खून केला. अशा घराण्याची सत्ता चालविणाऱ्या अप्पलपोट्या विरुध्द डिच्चूकावा करण्याशिवाय पर्याय नसल्याचे म्हंटले आहे. राधाकृष्ण विखे पाटील भाजपच्या मोदी गटात गेल्याबरोबर गृहनिर्माण मंत्री झाले, परंतु त्यांना घरकुल वंचितांना लॅण्ड व्हॅल्यू कॅप्चर योजनेद्वारे परवडणारी घरे देणे शक्य झाले नाही. त्यांनी याबाबतचा सकारात्मक विचार देखील केला नाही. लोक कल्याण्यापेक्षा मुलाचे पुनर्वसन करणे विखे पाटलांना महत्वाचे वाटले. धृतराष्ट्रने आपल्या मुलांसाठी जे केले, त्यापेक्षा राधाकृष्ण विखे पाटील यांनी काही केले नाही. नगर जिल्ह्यामध्ये सत्ताअप्पलपोट्या ओकांनी खेळवत ठेवली, परंतु लोकांच्या भल्यापेक्षा सत्तेसाठी अनेक कोलांट्याउड्या मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. पुणे-अहमदनगर अशी शटल सर्व्हिस रेल्वे गाडी सुद्धा विखे पाटील यांनी सुरू केली नाही. पंतप्रधान मोदी यांच्या समोर फक्त लाचारी करून सत्ता कायम ठेवण्यासाठीचे हे प्रयत्न आहे. ज्यांनी मतदारांना पैसे वाटले त्यांचा इतिहास मंत्री पदे मिळवण्यासाठी पक्षप्रमुखांना कोट्यावधी रुपये दिल्याचा आहे. देशातील नागरिकांना सोन्याच्या धुराचे आश्वासन देणाऱ्या सध्याचे राज्यकर्त्यांनी लोकभज्ञाक तत्त्वाला तीलांजली दिली आहे. भारत जगाचा नेता होण्यासाठी महात्मा गांधीजींनी राबविलेल्या लोकभज्ञाक तत्त्वाची गरज असल्याचे ड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे. लोकभज्ञाक चळवळीच्या यशस्वीतेसाठी ड. गवळी, अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे आदी प्रयत्नशील आहेत.

# हाफेज मोहम्मद अफजल यांच्या रुपाने सच्चा समाजसेवक हरपला

## हिंदी मराठी ग्रंथालय सेलू येथे मान्यवरांकडून भावपूर्ण श्रद्धांजली

**सेलू । प्रतिनिधी**

शहरातील प्रतिष्ठित सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यात पुढाकार घेणारे स्व. हाफेज मोहम्मद अफजल खाँ यांचे बुधवारी निधन झाले. पत्रकार मोहम्मद ईलियास यांचे वडील हाफेजजी त्यांच्या निधनाबद्दल १२ मे रोजी हिंदी मराठी ग्रंथालय सेलू येथे सेलू तालुका पत्रकार संघ व मित्र मंडळ यांच्या वतीने शोकसभेचे आयोजन केले होते. या शोकसभेत अनेक मान्यवरांकडून हाफेजजी यांच्या आठवणींना उजाळा देत हाफेजजी यांच्या रुपाने सच्चा समाजसेवक हरपला.अशा प्रकारे शब्दरूपी श्रद्धांजली त्यांना वाहण्यात आली.

याप्रसंगी व्यासपीठावर मौलाना खाजा सहाब कासीम, अशोकराव काकडे,रहिम खाँ पठाण,मराठी पत्रकार संघाचे प्रदेश प्रतिनिधी तथा प्राचार्य सुरेश नाईकवाडे,यांची उपस्थिती होती.या प्रसंगी मौलाना खाजा सहाब कासीम,म्हणाले की,सेलू शहरात मुलांना धार्मिक शिक्षण सहजतेने उपलब्ध होण्यासाठी मदरसा सुरू केली आज या मदसातून लाखो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले.याशिवाय त्यांनी मदिना मश्जीद येथे २५ वर्ष इमाम म्हणून काम करीत येथील रूप बदलून टाकले.अशा धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांत स्व. हाफेजजी यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या निधनामुळे एक सच्चा समाजसेवक हरपला अशी भावना जन माणसात निर्माण झाली आहे.

अशोकराव काकडे म्हणाले, मनुष्य किती दिवस जगला यापेक्षा तो कसा जगला हे त्यापेक्षाही महत्वाचे आहे.आपण समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून हाफेजजी यांनी गरजूंना केलेली मदत आणि सामाजिक दायीत्व यामुळे त्यांचे जाण्याने एक पोकळी निर्माण झाली.रहिमखान पठाण म्हणाले की,हाफेजजी यांचे व्यक्तिमत्त्वात,सेवाभाववृत्ती, दानसुरता, वक्तृत्व आणि कर्तृत्व यांचा सुंदर मिलाफ झालेला होता. पत्रकार रेवणअप्पा साळेगांवकर




म्हणाले की,जन्म आणि मृत्यू हे अटळ आहे. पण या दोघांमधील कालावधी म्हणजे कर्म ज्यांचे कर्म चांगले असेल त्याला ईश्वरलिलात देवमार्ग प्राप्त होते.मरावे परी किर्ती रुपी उरावे अशी किर्ती असणारे हाफेजजी यांनी उल्लेखनीय सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यातून माणसे जोडण्याचेही काम केले.त्यांचे आत्म्याला ईश्वर शांती देवो त्यांना देवमार्ग मिळो.याशिवाय त्यांचे कुटुंबीयांना दुखातुन सावरण्याचे ईश्वर बळ देवो असे म्हणाले.अँड.श्रीकांत वाईकर म्हणाले की,हाफेजजी हे व्यक्तीमत्व म्हणजे जिद्द,मेहनती व चिकाटी या गणांवर त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीने जनमानसात वेगळा ठसा उमटवला त्यांचे जाण्याने निर्माण झालेली उणीव भरून निघणार नाही अशीच आहे.प्राचार्य सुरेश नाईकवाडे म्हणाले की,या कुटुंबाच्या दुखात पत्रकार संघ सहभागी आहे. सर्व मान्यवरांनी हाफेजजी यांना शबदरूपी वाहीलेली श्रध्दांजली हीच किर्ती अजरामर आहे.शेवटी पत्रकार मोहम्मद ईलीयास यांनी सर्वांचे ऋण व्यक्त केले.सुत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी केले.याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी राहूल देशपांडे,अँड किशोर जवळेकर,अनिरूध्द जोशी अशोक फोपसे,पत्रकार राम सोनवणे,माजी सभापती रवि डासाळकर,डॉ. अरविंद बोराडे,सूरेंद्र गिल्डा,मिलिंद पवार,मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष लक्ष्मण बागल यांचेसह सह अनेक मान्यवर हाजर होते.

# बिबवेवाडी अप्पर डेपो येथे जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवात साजरी

**पुणे । प्रतिनिधी**

महामानव,विश्र्वगुरू,परिवर्तनवादी,सत्वपुरूष,लिंगायत धर्म संस्थापक,सामाजिक समतेचे आद्य प्रवर्तक,थोर समाजसुधारक,वर्गविरहित समाज निर्माता जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८९३ वी जयंती अक्षय-तृतीया दि. १० मे रोजी बिबवेवाडी अप्पर डेपो येथे श्री संगनबसवेश्वर तरुण मंडळाच्या वतीने विविध उपक्रमाने मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला.

बाजीराव रोड येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याला संगनबसवेश्वर तरुण मंडळाच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी ज्योत प्रज्वलित करून ती ज्योत पायवाट मार्गे अप्पर डेपो येथे इच्छित कार्यक्रम स्थळी आणून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून अक्कलकोट तालुक्याचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, मा नगरसेवक पिंटू भाऊ धाडवे,नगरसेवक बाळासाहेब ओसवाल,नगरसेविका रुपालीताई दिनेश धाडवे,नगरसेविका वर्षाताई साठे, भाजपा अनु :जाती मोर्चा शहर अध्यक्ष भीमराव साठे, शिव संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष शैलेश जकापुरे, युवा उद्योजक संजय पाटील,सामाजिक कार्यकर्ते मनोज देशपांडे,अखिल भारतीय मराठा पुणे शहर उपाध्यक्ष -भाजपा पर्वती सरचिटणीस ज्ञानेश्वर माऊली मानकर,श्री गणेश मित्र मंडळ अध्यक्ष प्रीतम शेठ नागपुरे,शिवशंभो टायर्स मा यार्ड गणेश घाटे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर सरचिटणीस गणेश मोहिते,गनिमी कावा युवा सेवा संघ संजय वाघमारे,युवा उद्योजक मधुकर सुरवसे,या सर्व प्रमुख उपस्थितांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थितांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित काही प्रसंग व त्यांची शिकवण याविषयी सर्व उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.याचवेळी महात्मा बसवेश्वर यांचा जन्मोत्सव सोहळा देखील मोठ्या संख्येने महिलांच्या उपस्थित पारंपारिक पद्धतीने महिलांनी पाळण्याची पूजा करून जन्माचा पाळणा सोहळा,गीत गाऊन व महात्मा बसवेश्र्वरांचा गजर केला.या कार्यक्रमात मोठ्या संख्येने अप्पर डेपो येथील बसवेश्वर भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.तसेच सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये संगनबसवेश्वर तरुण मंडळाचेसंस्थापक अध्यक्ष अशोक धोनी वर्दाळे, अध्यक्ष खंडू माने,उपाध्यक्ष शिवशरण रामचंद्र चिकमळ, सचिव शांतमल काळे,संग्राम आळदे,सुनील चिकमळ,बसवराज माळी,अभय माळी,बसवराज आलदे,श्रीशैल चिकमळ,संतोष माळी,रामेश्वर बिराजदार, सायबण्णा म्हेत्रे, शरणप्पा आलदे,बसवराज चौघुले, श्रीशैल निंगदळी,पुंडलिक बिराजदार,खजिनदार रेवणप्पा चिकमळ,सिद्धाराम माळी,रवी आलदे,जगदीश येणंपुरे,प्रकाश थंब,संतोष माळी,स्वागतोत्सुक इराण्णा मंठाळे,कार्याध्यक्ष मल्लिनाथ फुलारी,व साप्ताहिक राष्ट्रहित सर्वोपरी मीडिया समूहाचे मुख्य संपादक अमोल धडके, सर्व संघटक,कार्याध्यक्ष,आधारस्तंभ कार्यकर्ते, छोटे कार्यकर्ते,महिला व मंडळ,स्वागतोत्सुक,संगनबसवेश्वर तरुण मंडळाचे सर्व सभासद,स्थानिक नागरिक,मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडू माने यांनी केले.

# खो -खो उन्हाळी शिबिर खेमजई तथा इंग्लिश स्पोकन वर्गाचा समारोप

**वरोरा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खेमजई तथा ग्रामस्थ खेमजई यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक ३ मे ते १२ मे पर्यंत खो-खो उन्हाळी शिबिर तथा स्पोकन इंग्लिश वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात ११० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. शिबिरात खेमजई,साखरा, वरोरा,मोखाळा,नागरी,लोधीखेडा, सोनेगाव, वडगाव, तसेच कोरपना तालुक्यातील पिंपळगाव या नऊ गावचे विद्यार्थी सहभागी झाले होते. शिबिरात वर्ग ६ ते १२ पर्यंतचे विद्यार्थी सहभागी होते. हे शिबिर पूर्णतः निवासी होते.ग्रामिण भागात निवासी स्वरुपाचे दहा दिवसाचे खो -खो चे उन्हाळी शिबिर घेण्याचा हा जिल्ह्यातील पहीलाच प्रयोग होय.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण व्हावी, कौशल्यपूर्ण खेळ खेळता यावा व आत्मविश्वासाने इंग्रजी बोलता यावे यासाठी मौजा खेमजई येथे दहा दिवसांचे खो -खो उन्हाळी शिबिर तथा स्पोकन इग्लिश वर्ग आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन दिनांक ३ मे २०२४ ला सकाळी दहा वाजता ज्ञानेश्वर चहारे, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वरोरा यांच्या हस्ते व डॉ. अघडते पशुधन विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

शिबिरात दहा दिवसात शिबिरार्थीना खो-खो चे कौशल्य व इंग्रजी विषयाची माहिती शिकण्यास मिळाले.शिबिराची सुरुवात सकाळी पाच वाजता व्हायची.सकाळचे सत्र



५:०० ते १०:३० पर्यंत चालायचे यामध्ये सूक्ष्म व्यायाम, पाच किलोमीटर अंतर धावणे , खो-खो चे कौशल्य आणि खो-खो चा सराव चालायचा. सकाळी १०:३० ते दुपारी २:०० विश्रांती असायची.दुपारी २:००ते ५:३० पर्यंत गोपाळ गुडधे यांचा इंग्लिश स्पोकन वर्ग चालायचा. सायंकाळी सहा ते नऊ पर्यंत परत रनिंग, व्यायाम व खो खो चे स्कील व सराववर्ग नियमितपणे चालायचा. दुपारच्या सत्रात दुपारी दोन ते पाच या सत्रात गो वीथ स्ट्रक्चर तर्फे इंग्रजी स्पोकन वर्गाचे आयोजन केले जात होते. गोपाळ गुडधे हे नियमितपणे दहा दिवस निवासी राहून वर्ग घेत होते. या अशा महत्वपूर्ण आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिकण्यास मदत झालेल्या या शिबिराचा समारोप दिनांक १२ मे २०२४ ला सायंकाळी पाच वाजता संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत खेमजईच्या सरपंच मनीषा चौधरी ह्या होत्या. कार्यक्रमाचे बक्षीस वितरक म्हणून डॉक्टर अश्विनी सोनवणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. चंद्रपूर हजर होत्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानेश्वर चहारे गटशिक्षणाधिकारी पं.स.वरोरा , नितीन मत्ते , शिवसेना जिल्हा प्रमुख चंद्रपूर, चंद्रहास मोरे उपसरपंच ग्रामपंचायत खेमजई, डॉक्टर गंपावर , डॉ. अघडते पशुधन विकास अधिकारी श्रेणी एक खेमजई, नामदेवराव राऊत माजी शिक्षण विस्तार अधिकारी, सागर पाटील केंद्रप्रमुख शेगाव बु. प्रा.पावडे दिशा एज्यूपॉईंट वरोरा, रमेश बावणे माजी सरपंच खेमजई, रमेश चौधरी सदस्य ग्रा.पं. खेमजई ,नथ्थू घरत तथा बहुसंख्येने ग्रामस्थ हजर होते.

बक्षीस वितरक डॉ. अश्विनी सोनवणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. चंद्रपूर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना जगातील सर्वात लहान गिर्यारोहक ही ग्रामीण भागातील मुलगी होती आणि ग्रामीण भागातील मुलांमध्ये कौशल्य व अपार क्षमता लपलेल्या आहेत असे सांगितले. आपण सुद्धा भामरागड येथे कार्यरत असताना अशाच प्रकारचे २०० ते ३०० मुलांचे शिबिर आयोजित करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास भर घालण्याचा प्रयत्न केला. या कामी शासनाची सुद्धा मदत झाली असे सांगितले .

कार्यक्रमात शिबिरातील बेस्ट बॉईज कॅडेट ऑफ समर कॅम्प २०२४ कुमार दीक्षांत आडे व कुमार भृवेश ठाकरे याचा तर बेस्ट गर्ल कॅडेट ऑफ द समर कॅम्प २०२४ कु .प्राची चौधरी व कु. अदिती काळे हीचा ट्राफी देऊन डॉ. अश्विनी सोनवाने शिक्षणाधिकारी ( प्राथमिक)जि.प.चंद्रपूर यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.तर बेस्ट ऑफ द बेस्ट कॅडेट ऑफ द समर कॅम्प २०२४ रुद्र नैताम ,नागरी ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन या शिबिरातील शिबिरार्थी मोनिका तुळशीराम तुमसरे वर्ग आठवा हीने केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा अहवाल वाचन या शिबिराचे संयोजक तथा शिबीर प्रमुख संजू श्रावण जांभुळे यांनी केले. शिबिरात सतत दहा दिवस निवासी राहून कुंभारे खो खो नॅशनल पंच, स्वप्निल सायंकार राज्यस्तरीय थलेटिक पंच , बंटी घुगल , पूजा नेवारे , आयुषी मोहूर्ले ,कुमारी धनश्री ताजणे यांनी मार्गदर्शक तथा कोच म्हणून भूमिका पार पाडली.

या शिबिराला सर्व प्रकारची मदत ग्रामस्थांनी केली. शिबिर निवासी असल्यामुळे त्यांच्या राहण्याची, जेवणाची, नाश्त्याची व्यवस्था खेमजई ग्रामवासियांनी केली .कार्यक्रमाचे आभार शिबिरार्थी नियती चौधरी हीने केले.

# दोन वाघामध्ये जुंपली झुंजीत एकाचा मृत्यू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दोन वाघांच्या झुंजीत एकाचा मृत्यू झाला असून ही घटना सोमवार, १३ मे रोजी बल्लारपूर वनपरिक्षेत्रातील कारवा जंगल परिसरातील कक्ष क्रमांक २१० मध्ये उघडकीस आली. मृत वाघ अडीच वर्षाचा असून, तो नर असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी नरेश भोवरे यांनी दिली.

सोमवारी कारवा पर्यटन जंगल क्षेत्रात वनकर्मचारी गस्तीवर असताना त्यांना कक्ष क्रमांक ५१० मधील नियतक्षेत्रात एक वाघ मृतावस्थेत आढळून आला. याबाबतची माहिती त्यांनी वरिष्ठांना दिली. माहिती मिळताच वनाधिकारी घटनास्थळी पोहचले. पंचनामा करून चंद्रपूर येथील वन्यजीव उपचार केंद्रात पाठविण्यात आले. या केंद्रात पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कुंदन पोडचलवार, डॉ. आनंद



नेवारे यांनी उत्तरीय तपासणी केली. मृत वाघाचे सिलबंद नमुने घेण्यात आले असून, ते रासायनिक विश्लेषणासाठी वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात येणार आहे. पुढील तपास मध्य चांदा वनविभागाचे उपवनसंरक्षक श्वेता बोंड्डू, सहाय्यक वनसंरक्षक आदेश शेडगे यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी नरेश भोवरे करीत आहेत. ही कार्यवाही क्षेत्र सहाय्यक पी. व्ही. रामटेके, बि. टी. पुरी, वनरक्षक वैशाली जेनेकर, माया पवार, रंजीत दुर्योधन, परमेश्वर आनकाडे, एस. एस. नैताम यांनी केली.

# ज्येष्ठ नागरिकांनी उत्तम आरोग्यासाठी योग साधना अवलंबवावी-डॉ.बी.एच.दाभेरे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

इंडियन रेड क्रॉस सोसायटी चंद्रपूर तर्फे स्थानिक आझाद बगीच्या येथे जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉक्टर बी. एच.दाभेरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉक्टर बी. एच.दाभेरे म्हणाले की संपूर्ण आयुष्य संकटाचा सामना करत यशस्वी जीवन जगण्याऱ्या ज्येष्ठ नागरिकांनी आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी जगमान्य अशी योग साधनेची अंमलबजावणी आपल्या दैनंदिन जीवनात करावी. तसेच यथायोग्य औषधोपचार घेत असताना आवश्यक त्या रक्त चाचण्या देखील कराव्या आणि आपले आयुष्य आरोग्यदायी ठेवावे. या कार्यक्रमाच्या दरम्यान एन.सी.डी. विभागातर्फे उपस्थित जनसमुदायाची सामान्य रुग्णालय यांच्या मार्फत निशुल्क रक्तदाब व शर्करा तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर मंगेश



गुलवाडे सचिव रेड क्रॉस सोसायटी चंद्रपूर यांनी केले. व या कार्यक्रमांमध्ये विशेष उपस्थिती म्हणून पुष्पाताई गुलवाडे, छबुताई वैरागडे,अश्विनी खोब्रागडे, डॉक्टर आशिष बारब्दे, अँड प्रीती शहा, नरेंद्र भुते यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन धनंजय तावाडे तर आभार पियुष मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष मुरस्कर,आरिफ काझी, रुपेश ताकसांडे यांनी अथक परिश्रम घेतले.

# आळंदीत चैत्र गौरी पूजनास महिलांची गर्दी;श्री रामलल्ला चंदन उटी दर्शनास माऊली भक्तांची गर्दी

**आळंदी । प्रतिनिधी**

श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात प्रथा परंपरांचे पालन करीत चैत्र महिन्यात श्रींना चंदन उटी लावण्यात येते. माऊलींचे संजीवन समाधीवर चंदन उटीतून श्रींचे श्री रामलल्ला वैभवी रूप साकारण्यात आले. श्रींचे वैभवी रूप दर्शनासह चैत्र गौरी पूजनास भाविकांनी माऊली मंदिरात तसेच ठिक ठिकाणचे मंदिरांत दर्शनास गर्दी केली. श्रींचे उटीसह गाभाऱ्यात मोगरा फुलांची लक्षवेधी सजावट, आंब्यांची आरास, समीप श्रीराम मंदिर प्रतिकृती पाहण्यासह भाविकांनी गर्दी केली. स्वकामसेवा मंडळाचे वतीने भाविकांना पन्ह आणि डाळ प्रसाद वाटप करण्यात आले. अक्षय तृतीये निमित्त आळंदी देवस्थान आणि स्वकाम सेवा मंडळाचे वतीने अध्यक्ष सुनील तापकीर आणि सर्व स्वकाम सेवक साधकांनी उटीचे लक्षवेधी नियोजन करीत चंदन उटी सेवा रुजू केली. मंदिरात चैत्र गौरी पूजन, चंदन उटी दर्शन उत्साहात झाले. महिला भाविकांनी कारंजा मंडपात गर्दी करून श्रींचे दर्शन घेत हळदी-कुंकू घेतले. आळंदी मंदिरातील कारंजा मंडपात चैत्र गौरी पूजना निमित आकर्षक सजावट करण्यात आली होती. चैत्र गौरीचे वैभवी रूप पाहण्यासह दर्शनास महिला, भाविक, नागरिकांनी गर्दी केली. श्रीचे गाभाऱ्यात अक्षय तृतीये निमित्त संजीवन समाधीवर चंदन उटीतुन माऊलींचे श्री रामलल्ला रूप परिश्रम पूर्वक अभिजित धोंडफळे, मोरेश्वर जोशी, योगेश चौधरी, महेश जोशी यांनी साकारले. विविध वस्त्रालंकारांनी सजलेले श्रींचे रूप दर्शनास भाविकांनी गर्दी केली. आळंदी परिसरात साडेतीन मुहूर्ता पैकी एक असणारा अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधत विविध नवीन उपक्रम आणि वाहन खरेदी निमित्त वाहनाची मंदिरा बाहेर पूजा मोठ्या उत्साहात करण्यात आली. माऊली मंदिरातील प्रथा परंपरांचे पालन करीत अक्षय तृतीये निमित्त प्रथम घंटानाद, काकडा, श्रींना पवमान अभिषेक, दुधारती, पूजा आणि भाविकांचे दर्शन तसेच महिलांचा हळदी-कुंकू असे कार्यक्रम उत्साहात झाले. अक्षय तृतीया दिनी आळंदी देवस्थानचे श्रींचे दर्शन घेत मंदिरास भेट दिली. या प्रसंगी घेतले. व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, संजय रणदिवे, श्रीकांत लवांडे, ज्ञानेश्वर पोंदे, सोमनाथ लवंगे आणि सेवक यांनी देवस्थानच्या प्रथा प्रमाणे धार्मिक महत्व ओळखून भाविकांच्या दर्शनाची व्यवस्था ठेवली. संस्थांनचे संजय लवांडे, सोमनाथ लवंगे, महेश गोखले आर्दीनी मंदिरातील तसेच भाविकांचे दर्शनाचे नियोजन केले. येथील नव्याने भव्य दिव्य विकसित करण्यात आलेल्या श्री लक्षशांती गणेश मंदिरात श्रींचे मंदिर गाभाऱ्यातलक्षवेधी आंब्यांची सजावट करण्यात आली. अक्षय तृतीये निमित्त परिसरातील नागरी, भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. यासाठी श्रींचे मंदिर निर्माते शांता येळवंडे, लक्ष्मण येळवंडे, सचिन येळवंडे, संतोष येळवंडे, सागर येळवंडे आणि येळवंडे परिवार यांनी परिश्रम घेतले. यावेळी भाविकांनी श्रींचे दर्शनास तसेच पूजा, आरास पाहण्यास गर्दी केली. भाविकांना मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी श्री व सौ शांता लक्ष्मण येळवंडे परिवाराने भाविकांचे स्वागत केले. येथील श्री संत गोरोबाकाका समाधी मंदिरात अक्षय तृतीया निमित्ताने भगवान परमात्मा श्री विठ्ठल अवतार चंदन उटी परिश्रम पूर्वक साकारण्यात आली. यासाठी संत गोरोबा काका यांचे वंशपरंपरागत पुजारी किशोर दाते, किरण दाते आणि त्यांचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप यांनी सहकारी बल्लाळेश्वर वाघमारे यांनी परिश्रम घेतले,

# आयपीएल सट्टा अड्ड्यावर आय पी एस नयोमी साटम यांची धाड

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा येथे लेडी सिंघम म्हणून जबरदस्त कामगिरी करणाऱ्या सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी आय पी एस नयोमी साटम यांनी १२ मे ला सायंकाळी आयपीएल सट्ट्यावर धाड टाकून दोन आरोपीना अटक केल्याची सनसनिखेज माहिती समोर आली असून अटक केलेल्या आरोपीसह सट्टा खेळणाऱ्या जवळपास ३० लोकांविरोधात वरोरा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे, त्यांच्या या कार्यवाहीने सट्टा बाजारात मोठी खळबळ उडाली असून कोट्यावधीच्या या जुगारात काही प्रतिष्ठित व मोठे व्यापारी असल्याने सर्वांचे धाबे दाणाणले आहे.

दरम्यान ज्या सट्टा लावणाऱ्यावर गुन्हे दाखल झाले त्यात नागपूर, वणी ,वरोरा ,भद्रावती या शहरातील लोकांचा समावेश आहे.

काही महिन्यापूर्वी आय पी एस नयोमी साटम यांनी पदभार सांभाळल्यानंतर आपल्या पदाला न्याय देत त्यांनी धडाकेबाज कार्यवाहीला सुरुवात केली, मग अवैध दारू विक्री असो, अवैध रेती उत्खनन व वाहतूक असो की सट्टापट्टी असो त्यांनी अच्छा अच्छाचा बाजार उठवला आणि कायद्यापुढं कुणी मोठा नाही हे दाखवून दिलं, दरम्यान जिल्ह्यात एवढी वर्ष होऊन सुद्धा आयपीएल सट्ट्यावर कुणी धाड टाकून मोठी कार्यवाही करू शकले नव्हते, मात्र



आपल्या धडक कार्यवाईने वरोरा भद्रावती तालुक्यात लेडी सिंघम म्हणून नावलौकिक मिळविलेल्या सहाय्यक पोलीस अधीक्षक आय पी एस नयोमी साटम यांनी दि.१२ मे रोजी आय.पी.एल. मॅचवर बेटींग करून, हार-जीतचा जुगार खेळत असलेल्या घरी धाड मारून दोन आरोपी ना अटक केली, दरम्यान त्यांच्या या कारवाईने त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होतं आहे.सहायक पोलीस अधिक्षक, तथा उपविभागीय पोलीस अधिकारी आय पी एस नयोमी साटम, उपविभाग वरोरा यांनी, गोपनीय बातमीदारांकडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे, पो.स्टे. वरोरा येथील स.पो.नि. विनोद जांभळे, व पोलीस स्टाफसह, गुळघाने यांचे घरी, बावने ले आउट, साई मंगल कार्यालयाच्या बाजुला, वरोरा येथे आय. पी. एल. वर सटटा खेळणारे आरोपीवर रेड केली असता, एक खोली मध्ये ओमप्रकाश देविदास जाधव, व आशिष गजानन जाधव, रा. वरोरा हे लॅपटॉप व मोबाईलच्या सहाय्याने चिन्नस्वामी स्टेडीयम, बेंगलोर येथील ग्राउंडवर, चालु असलेल्या दिल्ली कॅपिटल विरूध्द रॉयल चॅलेन्जर्स बेंगलोर या इंडीयन प्रिमीयर लिगच्या (आय.पी.एल.) लाईव्ह मॅचवर, पैशाची बाजी लावुन, व मोबाईलवरून, ग्राहकांकडुन मॅचचे सौदे घेऊन, हारजितचा जुगार खेळ खेळीत (सटट्रा लावतांना) असतांना मिळुन आले. वरून घटनास्थळावरून १० मोबाईल, ०१ लॅपटॉप, ०१ पेन ड्राईव्ह, ०२ कॅलक्युलेटर, एक ॲक्टीवा मोपेड, व इतर साहीत्य तसेच नगदी रक्कम ३२हजार ७४० रुपये असा एकुन २ लाख ६७ हजार ४१० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. व आरोपी नामे ओमप्रकाश देविदास जाधव, वय-४३वर्ष, आशिष गजानन जाधव, वय-२७ वर्ष दोन्ही रा. सुभाष वार्ड, आशिर्वाद मंगल कार्यालय वरोरा तर फरार आरोपी मिनाज शेख रा. वणी जि. यवतमाळ ,जम्मु शेख रा.वणी जि. यवतमाळ ,रितीक जाधव रा. वरोरा, अमोल डांगरे रा. वरोरा ,अमोल टिपले रा. वरोरा ,बादल लाखा रा. वरोरा, भुषण दिक्षीत रा. वरोरा , डॉ. काळे रा.वरोरा ,अजिंक्य नरडे रा. वरोरा , अमित घोडमारे रा. वरोरा ,समीर पाटील रा.वरोरा , सुरज रा. बुटट्टीबोरी नागपुर. ,राजेश तुपकर रा. वरोरा ,रवि गभणे रा.वरोरा ,राहुल टिपले रा. वरोरा ,पिंन्टु तडस रा. वरोरा , पिंन्टु टोंगे रा. वरोरा ,प्रसाद खडसान रा. वरोरा ,कुणाल चिमुरकर रा. वरोरा , मोहीत शर्मा रा. वरोरा ,अनिल पाटील रा. वरोरा , पंकज वैद्य रा. वरोरा ,अमित भगत रा. वरोरा , गौरव रा. वरोरा , रणजित रा. वरोरा ,अतुल वानखेडे रा. वरोरा , मंगेश राव. भद्रावती ,मंगेश रा. वरोरा यांचे विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला असुन, पुढील तपास सपोनि विनोद जांभळे पोस्टे वरोरा हे करत आहेत.सदर कारवाई मुमक्का सुदर्शन, पोलीस अधिक्षक, चंद्रपुर, श रिना जनबंधु, अप्पर पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली, आयपीएस नयोमी साटम, सहायक पोलीस अधिक्षक, उपविभाग वरोरा, सपोनि विनोद जांभळे, पो.अं. दिपक दुधे, दिपक मेश्राम, रिषभ काटकर, जितेंद्र राजुरकर, मोहन निषाद, राजु लोधी, विशाल राजुरकर, प्रशांत बावणे, चालक हेपट यांनी केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .